# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 20.06.2025** **वार- शुक्रवार**

---

**पालखी**

आषाढी वारीसाठी पंढरपूरकडे निघालेल्या संत श्री तुकाराम महाराज आणि संत श्री ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालख्यांचे आज पुणे शहरात आगमन होत आहे. तुकाराम महाराज यांचा पालखी सोहळा जुन्या मुंबई पुणे रस्त्यामार्गे आणि ज्ञानेश्वर महाराज यांचा पालखी सोहळा संगमवाडीमार्गे पुण्यात येत आहे. दोन्ही पालख्यांच्या स्वागतासाठी दुपारपासून पुणेकर नागरिकांनी रस्त्याच्या दुतर्फा गर्दी केली आहे. आता तुकाराम महाराज यांचा पालखी सोहळा वाकडेवाडी येथील दुपारचा विसावा घेऊन पाटील इस्टेटमार्गे पुण्यात येत आहे, तर संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याचा संगमवाडी येथे आता विसावा आहे, तुकोबांची पालखी मार्गस्थ झाल्यावर माऊलींची पालखी देखील पाटील इस्टेटमार्गे पुण्यात येईल. संगमवाडी येथील विसाव्याच्या ठिकाणी भाविकांनी दर्शनासाठी रांगा लावल्या आहेत. आगमनानंतर तुकोबांच्या पालखीचा मुक्काम नाना पेठेतील निवडुंगा विठ्ठल मंदिरात आणि माऊलींच्या पालखीचा मुक्काम भवानी पेठेतील पालखी विठोबा मंदिरात असेल.

**पालखी**

पालखी सोहळ्यामध्ये आग वा आपत्कालीन परिस्थितीत तातडीने मदतीसाठी अग्निशमन दलाचं वाहन दरवर्षी पुणे ते पंढरपूर या मार्गावर तैनात करण्यात येतं. यावर्षीदेखील पुणे महानगरपालिकेच्या

अग्निशमन दलाचं एक अग्निशमन वाहन, एक अधिकारी आणि सहा जवानांचं पथक काल आळंदीमध्ये दाखल झालं; हे पथक पुढे पंढरपूरपर्यंत तैनात राहणार आहे.

**योगदिन**

आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त उद्या पुण्यात केंद्र आणि सरकारची विविध कार्यालयं आणि खासगी संस्था, संघटना योग प्रात्यक्षिकं सादर करणार आहेत. केंद्रीय संचार ब्युरोच्यावतीनं यानिमित्तानं उद्यापासून तीन दिवस बहुमाध्यम चित्र प्रदर्शनाचं आयोजन करण्यात येणार आहे. पुणे मेट्रोच्या जिल्हा न्यायालय स्थानकात सकाळी ८ ते १० या वेळेत योगाभ्यास केला जाईल; त्यानंतर दहा वाजता या प्रदर्शनाचं उद्घाटन होणार आहे. संत ज्ञानेश्वर महाराज आणि श्री संत तुकाराम महाराज यांच्या पालख्या आज पुण्यात दाखल होत आहेत. उद्याच्या योग दिनी राज्य सरकारच्या पुढाकाराने भव्य ‘वारकरी भक्तीयोग उपक्रम’ आयोजित करण्यात आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत होणाऱ्या या उपक्रमात वारकरी, विद्यार्थी, योग अभ्यासक असे अनेक लोक एकत्रितपणे योगसाधना करणार आहेत.

**शरदपवारपत्रकारपरिषद**

हिंदी भाषेची सक्ती असू नये. पण, हिंदी भाषेचा द्वेष करणं हे विद्यार्थ्यांच्या हिताचं नाही, असं मत खासदार शरद पवार यांनी आज बारामतीमध्ये पत्रकारांशी बोलताना व्यक्त केलं. राज्यात सुरू असलेल्या हिंदी भाषेच्या सक्तीच्या वादावर भाष्य करताना शरद पवार म्हणाले की, कोणाला स्वसंमतीनं हिंदी भाषा शिकायची असेल तर त्याला नाही म्हणण्याचं कारण नाही. हिंदी भाषेकडे दुर्लक्ष करणं योग्य नाही, असं पवार म्हणाले. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकीबाबत महाविकास आघाडीचे घटक पक्ष लवकरच बैठक घेऊन निर्णय घेतील, असंही पवार म्हणाले.

**गडकरी**

माईर्स एमआयटी शिक्षण संस्थेतर्फे कोथरूडमध्ये श्रीमती सरस्वती कराड रुग्णालयाची उभारणी करण्यात आली आहे, त्याचं उद्घाटन येत्या सोमवारी केंद्रीय वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते होणार आहे, अशी माहिती संस्थेच्या सहव्यवस्थापकीय विश्वस्त डॉक्टर सुचित्रा कराड नागरे यांनी पत्रकार परिषदेत  दिली. या रुग्णालयात अत्याधुनिक सुविधांसह 200 खाटा उपलब्ध असून ज्येष्ठ नागरिकांसाठी रुग्णालयीन सेवेत 10 टक्के सवलत दिली जाणार आहे.

**<u>पुणेमनपा</u>**

पुणे महापालिकेत काम करणाऱ्या हजारो कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांची महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी गंभीर दखल घेतली आहे. कंत्राटी कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबियांनादेखील आरोग्य सुविधेचा लाभ मिळावा यासाठी कर्मचारी, ठेकेदार, अधिकाऱ्यांमध्ये जनजागृती करून प्रत्येक कर्मचाऱ्याला त्याच्या कुटुंबियांच्या नावांच्या समावेशासह ‘ई पहचान’   पत्र देण्याचे आदेश देण्यात आले आहेत. यामुळे कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या ईएसआयच्या रकमेपासून वेतनाबाबतदेखील अधिक पारदर्शकता येणार आहे.

**<u>काकडे</u>**

महाराष्ट्र सहकारी मुद्रणालयाच्या अध्यक्षपदी अंकुश काकडे यांची निवड झाली आहे. संचालक मंडळाच्या बैठकीत हा निर्णय एकमताने झाला.

**<u>गुन्हा</u>**

हैदराबाद इथल्या एका कंपनीनं उच्च परतावा देण्याचं आमिष दाखवून पुण्यातील ३६ गुंतवणुकदारांची ८ कोटी ५४ लाख रुपयांची फसवणूक केल्याचं समोर आलं आहे. गेल्या दोन ते तीन वर्षांपासून हा गैरप्रकार सुरू होता; या प्रकरणी मार्केट यार्ड परिसरातील एका डॉक्टरांनी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यावरून पोलिसांनी फाल्कन ग्रुप आणि कॅपिटल प्रोटेक्शन फोर्स या कंपनीच्या अधिकाऱ्यांवर गुन्हा

दाखल केला आहे. फसवणूक झालेल्या गुंतवणुकदारांमध्ये कल्याणीनगर, रहाटणी, पिंपळे निलख, पिंपळे सौदागर, परिसरातील उच्चशिक्षित नागरिकांचा समावेश आहे.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज पावसाच्या काही हलक्या सरी बरसल्या. आज दिवसभर आकाश ढगाळ होतं. उद्याही आकाश ढगाळ राहून पुणे आणि परिसरात हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या तर घाट परिसरात मुसळधार पावसाची शक्यता पुणे वेधशाळेनं वर्तवली आहे.

**<u>धरणसाठा</u>**

दरम्यान काल झालेल्या मुसळधार पावसामुळे खडकवासला धरणाच्या पाणी पातळीत वाढ झाली आहे. त्यामुळे धरणातून मुठा नदी पात्रामध्ये विसर्ग सुरू आहे. कालच्या तुलनेत विसर्ग कमी करण्यात आला असला तरी नागरिकांनी सतर्कता बाळगावी असं आवाहन पाटबंधारे विभागानं केलं आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**